नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३
नि. २६६

वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा शपथेवर जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— राजेश वडीलांचे/पतीचे नांव — रविंद्र पराडकर
वय सुमारे ४५ वर्षे, धंदा—वकीली
रा. सबनिसवाडा, सावंतवाडी ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग.

सरतपास वादीतर्फे वकील श्री. आर.एस्. गव्हाणकर यांचेतर्फे

१. मी १६ वर्षापासून सावंतवाडी येथे वकीली व्यवसाय करतो. मी लक्ष्मण गव्हाणकर, गोविंद कृष्णाजी वाळके, पुष्पाकर कृष्णाजी वाळके, सौ. सीमा उदयशंकर नेवगी, श्रीमती भारती मोरेश्वर भोगटे, सौ. सुचिता अशोक भोगटे व सौ. रश्मी रमेश कोदे यांना ओळखतो. मला आता नि. १९७ वरील खरेदीखत दाखवले. त्या खरेदीखताला मी साक्षीदार होतो. साक्षीदार म्हणून खरेदीखतावर माझी सही आहे. त्या खरेदीखताला दुसरे साक्षीदार हे अशोक संभाजी सावंत हे होते. त्या खरेदीखतावर लिहून देणारतर्फे गोविंद कृष्णाजी वाळके यांनी स्वत:करीता व अन्य यांचे कुलअखत्यारी म्हणून सहि केलेली आहे व लिहून घेणार म्हणून लक्ष्मण सखाराम गव्हाणकर यांनी सही केलेली आहे.

उलटतपास प्रतिवादी क्र. १,२,५ ते ७, ११ , १३, १४ व १६ तर्फे वकील श्री.एस्.जी. पणदुरकर यांचेतर्फे

२. मी सन १९९९ ते सन २००७ पर्यंत ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांच्याकडे प्रशिक्षणार्थी वकील म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण सखाराम गव्हाणकर हे ॲड. आर. एस. गव्हाणकर यांचे सख्खे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश रामचंद्र धारपवार हे ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांच्याकडे कारकून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अशोक संभाजी सावंत हे ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांचे पक्षकार होते. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. दिपक बाबली म्हालटकर हे ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांचेकडे सन २००३ साली प्रशिक्षणार्थी वकील म्हणून कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, कुतुबुददीन जमाल हा ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांचा कारकून होता व आजही आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. १९७ चे खरेदीखत हे ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांच्या कार्यालयातील संबंधित व्यक्तींच्या समोरच तयार झालेले खरेदीखत आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, नि. १९७ च्या खरेदीखतावरील सर्व माणसे ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांच्या कार्यालयातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताचा मुद्रांक लिहून घेणार याने विकत घेतलेला आहे. लिहून देणार हा खरेदीखतासाठी मुद्रांक घेतो हे मला सांगता येणार नाही. खरेदीखतासाठी मुद्रांक कोणी घ्यायचा असतो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पुष्पाकर कृष्णाजी वाळके, सौ. सीमा उदयशंकर नेवगी, श्रीमती भारती मोरेश्वर भोगटे, सौ. सुचिता अशोक भोगटे व सौ. रश्मी रमेश कोदे यांना पाहिले नाही व केवळ गोविंद कृष्णाजी वाळके यांना पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पुष्पाकर कृष्णाजी वाळके, सौ. सीमा उदयशंकर नेवगी, श्रीमती भारती मोरेश्वर भोगटे, सौ. सुचिता अशोक भोगटे व सौ. रश्मी रमेश कोदे यांना मी गोविंद कृष्णाजी वाळके यांनी सांगितल्यावरून ओळखतो. माझ्यासमक्ष पैसे देण्या—घेण्याचा व्यवहार झालेला आहे. माझ्यासमक्ष रूपये दोन लाख इतकी रक्कम दिली होती. मला त्या नोटांचे वर्णन सांगता येणार नाही. खरेदीखत झाले त्यावेळी हा दावा प्रलंबित होता. या दाव्यातील जी मिळकत आहे तीच खरेदीखताची मिळकत आहे हे मला माहित नाही. साक्षीदाराला खरेदीखत व दावा दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, दोन्हींमधील मिळकती

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३
नि. २६६ लगत

सारख्याच आहेत. खरेदीखताचे मिळकतीबाबत दावा प्रलंबित होता हे मला त्यावेळी माहित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद कृष्णाजी वाळके हा आमच्या कार्यालयाचा पक्षकार होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटे व बोगस खरेदीखत तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी ॲड. आर. एस्. गव्हाणकर यांच्याकडे प्रशिक्षणार्थी वकील असल्यामुळे त्यांच्या भावाच्या फायदयासाठी आम्ही हा खोटा दस्त तयार केला.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.

दिनांक :— २६/०२/२०१८.